# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरात अंबाझरी तलाव येथे मोठ्या प्रमाणात जलपर्णी
**{ स.वि.विभाग }** आढळते. सदर जलपर्णी तलावाला व्यापत असून एक पर्यावरणीय संकट आहे. जलपर्णी कडे आपण एक नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहतो परंतु खरे तर असे आहे का? याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता हे नैसर्गिक आपत्ती नसून संपत्ती आहे असे लक्षात येते. खरे तर कचऱ्यातून संपत्ती निर्मितीचे एक उदाहरण आहे. पाण्यावर वनस्पतीचा जाड थर निर्माण होतो जलपर्णी अमाप सौर ऊर्जा शोषून हजारो टन जैव वस्तुमानाच्या रूपात ऊर्जा साठवण करते जलपर्णी हे सौर पॅनल प्रमाणेच कार्य करते. तसेच जलपर्णीचे अनेक फायदे आहेत जसे की पाण्यातील प्रदूषणे शोषण पाणी शुद्ध करते. औषध निर्मिती तसेच पशुखाद्य म्हणूनही तिचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. यापासून गांडूळ खत कंपेस्ट कट व मिथेन गॅसची निर्मिती करता येते तसेच यापासून टोपली कागद कार्डबोर्ड, टोप्या, चटया, फर्निचर, पॅकिंगचा कागद ज्यूट सोबत मिळून दोरखंड इत्यादी बनवता येतो.

सदर निरूपयोगी जलपर्णी पासून विविध वस्तू तयार करण्याकरिता स्वयंसहायता समूहातील महिलांना प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. त्याअनुषंगाने कौशल्य विकास केंद्र, पारडी येथील दोन कक्ष (ब्लॉक) अंदाजे १२०० ते १४०० स्क्वे. फु. जागेमध्ये जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प सुरू करण्याबाबत विभागाचे मानस आहे.

स्वयंसहायता समूहातील १० महिलांच्या माध्यमातून जलपर्णीची योग्यरीत्या छाटणी करून, जमिनीवर ताडपत्री टाकून त्यावर विविध आकारातल्या जलपर्णीचे विलगीकरण करून, ठेवण्यात येईल व त्यांचे गुच्छे (Bunch) करण्यात येईल. गुच्छे (Bunch) करण्यात आलेले जलपर्णी साठवून ठेवण्यात येईल. तद्नंतर साठवून ठेवण्यात आलेली जलपर्णी कौशल्य विकास केंद्र, पारडी येथे पुढील प्रक्रीयेकरिता पाठविण्यात येईल.

सदर प्रकल्पा अंतर्गत लूम मशीनद्वारे ५० महिलांना व रोलर मशीनद्वारे ५० महिलांना कौशल्य प्रशिक्षण देऊन, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कौशल्य विकास केंद्र, पारडी येथील तळ मजल्यावरील दोन कक्ष (ब्लॉक) अंदाजे १२०० ते १४०० स्क्वे. फु. जागेवर जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प सुरू करण्याकरिता व नागपूर शहरातील स्वयंसहायता समूहातील महिलांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल.

सदर विषयाबाबतचे प्रशिक्षण देण्याकरिता अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेमार्फत निंबाळा / दुधाळा, गोजोली, दहेली, चोरगांव जिल्हा-चंद्रपूर येथील ३९५ महिलांना प्रशिक्षण देऊन, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर प्रकल्प राबविण्याकरिता अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेची पुढील तीन महिन्याकरिता निवड करण्याकरिता व सदर तीन महिन्यात अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेचे कार्य समाधानकारक असल्यास पुढील तीन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येईल. सदर प्रकल्पाकरिता खालील नमूद केल्याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अनु .क्र | विवरण | संख्या | दर (रू) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| **A** | **Loom Machine Training for 50 Artisans** | | | |
| १ | 1 Loom Machine for 2 Trainee | 25 | 20,000.00 | 5,00,000.00 |
| २ | Tool Kit | 50 | 8,559.00 | 4,27,950.00 |
| ३ | 31k Stitching Machine | 10 | 30,000.00 | 3,00,000.00 |
| ४ | Kanghi (फणी( | 50 | 5,000.00 | 2,50,000.00 |
| | | | **एकूण (A)** | **14,77,950.00** |
| **B** | **Roller Machine Training for 50 Artisans** | | | |
| ५ | Roller Machine per 1 Trainee | 25 | 8,000.00 | 2,00,000.00 |
| ६ | Tool Kit | 50 | 6,500.00 | 3,25,000.00 |
| ७ | 31k Stitching Machine | 10 | 30,000.00 | 3,00,000.00 |
| ८ | Dryer Machine | 1 | 50,000.00 | 50,000.00 |
| ९ | Air Compressor | 2 | 25,000.00 | 50,000.00 |
| १० | Washing Tub | 25 | 500.00 | 12,500.00 |
| | | | **एकूण (B)** | **9,37,500.00** |
| **C** | **Other Expenses** | | | |
| ११ | Bottom Less | 100 Kg | 175.00 | 17,500.00 |
| १२ | Belt | 100 Kg | 150.00 | 15,000.00 |
| १३ | Runner | 6 Bundle | 2,850.00 | 17,100.00 |
| १४ | Chain | 12 Pkt | 850.00 | 10,200.00 |
| १५ | Chart Paper | 5000 | 13.00 | 65,000.00 |
| १६ | Fevicol | 100 Kg | 180.00 | 18,000.00 |
| १७ | Leather | 100 Mtr | 130.00 | 13,000.00 |
| १८ | Astar | 100 Mtr | 30.00 | 3,000.00 |
| १९ | Febric | 100 Mtr | 75.00 | 7,500.00 |
| २० | Polishing | 50 Ltr | 340.00 | 17,000.00 |
| २१ | Thiner | 50 Ltr | 180.00 | 9,000.00 |
| २२ | Thread | 500 Bundle | 60.00 | 30,000.00 |
| २३ | Canvas | 500 Mtr | 120.00 | 60,000.00 |
| २४ | Green Mat | 2 | 2,000.00 | 4,000.00 |
| २५ | Notice Board | 1 | 3,650.00 | 3,650.00 |
| २६ | Front Board | 1 | 1,500.00 | 1,500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **एकूण (C)** | **2,91,450.00** |
| **D** | **Trainer** | | | |
| २७ | लूम मशीनकरिता प्रशिक्षक | 5 x 3 महिने | 20,000.00 | 3,00,000.00 |
| २८ | रोलर मशीनकरिता प्रशिक्षक | 5 x 3 महिने | 20,000.00 | 3,00,000.00 |
| | | | **एकूण (D)** | **6,00,000.00** |
| | | | **Grand Total (A+B+C+D)** | **33,06,900.00** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिनियम प्रकरण पाच संविदा २ (२) मधील तरतूदीन्वये, पुढील तीन महिन्याकरिता विनानिविदा जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प, अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेमार्फत कार्य करण्याकरिता रू. ३३,०६,९००/- (अक्षरी – रूपये तेहत्तीस लक्ष सहा हजार नऊशे फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन मान्यता प्रदान करण्यास्तव सादर प्रस्तुत.

टिप :- १) सदर खर्च म.न.पा. अर्थसंकल्पात सन २०२४-२०२५ व २०२५-२०२६ अंदाजपत्रकातील पद क्र. A47002473803 मधून करण्यात येईल.

२) सविस्तर माहिती नस्ती सोबत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1290/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 12/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात अंबाझरी तलाव येथे मोठ्या प्रमाणात जलपर्णी आढळते. सदर जलपर्णी तलावाला व्यापत असून एक पर्यावरणीय संकट आहे. जलपर्णी कडे आपण एक नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहतो परंतु खरे तर असे आहे का? याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता हे नैसर्गिक आपत्ती नसून संपत्ती आहे असे लक्षात येते. खरे तर कचऱ्यातून संपत्ती निर्मितीचे एक उदाहरण आहे. पाण्यावर वनस्पतीचा जाड थर निर्माण होतो जलपर्णी अमाप सौर ऊर्जा शोषून हजारो टन जैव वस्तुमानाच्या रूपात ऊर्जा साठवण करते जलपर्णी हे सौर पॅनल प्रमाणेच कार्य करते. तसेच जलपर्णीचे अनेक फायदे आहेत जसे की पाण्यातील प्रदूषणे शोषण पाणी शुद्ध करते. औषध निर्मिती तसेच पशुखाद्य म्हणूनही तिचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. यापासून गांडूळ खत कंपेस्ट कट व मिथेन गॅसची निर्मिती करता येते तसेच यापासून टोपली कागद कार्डबोर्ड, टोप्या, चटया, फर्निचर, पॅकिंगचा कागद ज्यूट सोबत मिळून दोरखंड इत्यादी बनवता येतो.

सदर निरूपयोगी जलपर्णी पासून विविध वस्तू तयार करण्याकरिता स्वयंसहायता समूहातील महिलांना प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. त्याअनुषंगाने कौशल्य विकास केंद्र, पारडी येथील दोन कक्ष (ब्लॉक) अंदाजे १२०० ते १४०० स्क्वे. फु. जागेमध्ये जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प सुरू करण्याबाबत विभागाचे मानस आहे.

स्वयंसहायता समूहातील १० महिलांच्या माध्यमातून जलपर्णीची योग्यरीत्या छाटणी करून, जमिनीवर ताडपत्री टाकून त्यावर विविध आकारातल्या जलपर्णीचे विलगीकरण करून, ठेवण्यात येईल व त्यांचे गुच्छे (Bunch) करण्यात येईल. गुच्छे (Bunch) करण्यात आलेले जलपर्णी साठवून ठेवण्यात येईल. तद्नंतर साठवून ठेवण्यात आलेली जलपर्णी कौशल्य विकास केंद्र, पारडी येथे पुढील प्रक्रीयेकरिता पाठविण्यात येईल.

सदर प्रकल्पा अंतर्गत लूम मशीनद्वारे ५० महिलांना व रोलर मशीनद्वारे ५० महिलांना कौशल्य प्रशिक्षण देऊन, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कौशल्य विकास केंद्र, पारडी येथील तळ मजल्यावरील दोन कक्ष (ब्लॉक) अंदाजे १२०० ते १४०० स्क्वे. फु. जागेवर जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प सुरू करण्याकरिता व नागपूर शहरातील स्वयंसहायता समूहातील महिलांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल.

सदर विषयाबाबतचे प्रशिक्षण देण्याकरिता अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेमार्फत निंबाळा / दुधाळा, गोजोली, दहेली, चोरगांव जिल्हा-चंद्रपूर येथील ३९५ महिलांना प्रशिक्षण देऊन, स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर प्रकल्प राबविण्याकरिता अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेची पुढील तीन महिन्याकरिता निवड करण्याकरिता व सदर तीन महिन्यात अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेचे कार्य समाधानकारक असल्यास पुढील तीन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येईल. सदर प्रकल्पाकरिता खालील नमूद केल्याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अनु . .क्र | विवरण | संख्या | दर (रू.) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| **A** | **Loom Machine Training for 50 Artisans** | | | |
| १ | 1 Loom Machine for 2 Trainee | 25 | 20,000.00 | 5,00,000.00 |
| २ | Tool Kit | 50 | 8,559.00 | 4,27,950.00 |
| ३ | 31k Stitching Machine | 10 | 30,000.00 | 3,00,000.00 |
| ४ | Kanghi (फणी( | 50 | 5,000.00 | 2,50,000.00 |
| | | | **एकूण (A)** | **14,77,950.00** |
| **B** | **Roller Machine Training for 50 Artisans** | | | |
| ५ | Roller Machine per 1 Trainee | 25 | 8,000.00 | 2,00,000.00 |
| ६ | Tool Kit | 50 | 6,500.00 | 3,25,000.00 |
| ७ | 31k Stitching Machine | 10 | 30,000.00 | 3,00,000.00 |
| ८ | Dryer Machine | 1 | 50,000.00 | 50,000.00 |
| ९ | Air Compressor | 2 | 25,000.00 | 50,000.00 |
| १० | Washing Tub | 25 | 500.00 | 12,500.00 |
| | | | **एकूण (B)** | **9,37,500.00** |
| **C** | **Other Expenses** | | | |
| ११ | Bottom Less | 100 Kg | 175.00 | 17,500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | Belt | 100 Kg | 150.00 | 15,000.00 |
| १३ | Runner | 6 Bundle | 2,850.00 | 17,100.00 |
| १४ | Chain | 12 Pkt | 850.00 | 10,200.00 |
| १५ | Chart Paper | 5000 | 13.00 | 65,000.00 |
| १६ | Fevicol | 100 Kg | 180.00 | 18,000.00 |
| १७ | Leather | 100 Mtr | 130.00 | 13,000.00 |
| १८ | Astar | 100 Mtr | 30.00 | 3,000.00 |
| १९ | Febric | 100 Mtr | 75.00 | 7,500.00 |
| २० | Polishing | 50 Ltr | 340.00 | 17,000.00 |
| २१ | Thiner | 50 Ltr | 180.00 | 9,000.00 |
| २२ | Thread | 500 Bundle | 60.00 | 30,000.00 |
| २३ | Canvas | 500 Mtr | 120.00 | 60,000.00 |
| २४ | Green Mat | 2 | 2,000.00 | 4,000.00 |
| २५ | Notice Board | 1 | 3,650.00 | 3,650.00 |
| २६ | Front Board | 1 | 1,500.00 | 1,500.00 |
| | | | **एकूण (C)** | **2,91,450.00** |
| **D** | **Trainer** | | | |
| २७ | लूम मशीनकरिता प्रशिक्षक | 5 x 3 महिने | 20,000.00 | 3,00,000.00 |
| २८ | रोलर मशीनकरिता प्रशिक्षक | 5 x 3 महिने | 20,000.00 | 3,00,000.00 |
| | | | **एकूण (D)** | **6,00,000.00** |
| | | | **Grand Total (A+B+C+D)** | **33,06,900.00** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिनियम प्रकरण पाच संविदा २ (२) मधील तरतूदीन्वये, पुढील तीन महिन्याकरिता विनानिविदा जलपर्णी पासून हस्तशिल्प व रोजगार निर्मिती प्रकल्प, अजय बहुउद्देशीय संस्था, भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर या संस्थेमार्फत कार्य करण्याकरिता रू. ३३,०६,९००/- (अक्षरी – रूपये तेहत्तीस लक्ष सहा हजार नऊशे फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.